THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 17TH OCTOBER 1895.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुकाम जंजिरे मुंबई, तारीख ७ माहे मे सन १८९५.

नंबर३४३३.— हिंदुस्थान सरकारानें आपल्या फिनान्स ॲण्ड कामर्स डिपार्टमेंटचा जाहिरनामा * नंबर १४९४ एस-आर, तारीख २९ मार्च १८९५, ह्यांत असें ठरविलें आहे कीं, त्या सरकारचा जाहिरनामा नंबर ३६१, तारीख १८ एप्रील १८८३, ह्याच्या तारिखे रोजीं उपयोगांत असलेले आणि " Court fees " असे शब्द ज्यांवर आहेत असे चिकटणारे स्टांप कोर्टाचे फीचा आक्ट (सन १८७० चा ७ वा) ह्याअन्वयें घ्यावयाची फी कोणत्याही बाबतींत १० रुपयांहून कमी असेल तेव्हां ती दर्शविण्यासाठीं वापरूं नयेत; त्याअर्थीं, लोकांच्या माहितीसाठीं ह्यावरून असें जाहीर करण्यांत येत आहे कीं, जुन्या नमुन्याचे न वापरलेले कोर्ट फी स्टांप ज्या इसमांजवळ असतील त्यांनीं ते स्टांप आपल्या कबजांत कसे आले ह्याबद्दल खातरीलायक खुलासा केला असतां त्यांस त्या स्टांपांच्या मोबदला, तितक्याच किंमतीचे सन १८८३ सालीं सुरू केलेले व हल्लीं उपयोगांत आहेत असे चिकटणारे कोर्ट फी स्टांप देण्यांत येतील; किंवा त्या जुन्या नमुन्याच्या स्टांपांच्या मालकांस तसें करणें जास्त बरें वाटलें तर, हा जाहिरनामा प्रसिद्ध होण्याच्या तारिखेपासून तीन महिन्यांच्या आंत कलेक्टरांकडे व तिजोरी अमलदारांकडे अर्ज केला असतां त्यांस अशा जुन्या स्टांपांची पुरी किंमत रोख परत देण्यांत येईल.

* तारीख ४ एप्रिल सन १८९५ चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, ह्याच्या ४१५ व्या पृष्ठावर सरकारचा जाहिरनामा नंबर २६५३, तारीख २ मिनहू ह्या अन्वयें प्रसिद्ध केलेला.

आलीजाह गव्हर्नर सा.हेब बहादुर ह्यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. मांटीथ,

अ.क्टिग सेक्रे.री निसबत सरकार.

(True Translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.